**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

**दिनांक २०/०१/२०२५ (सोमवार) दुपार**

---

## महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवसाच्या उपक्रम अंतर्गत संपूर्ण देशामध्ये लागू झालेल्या तीन नवीन कायद्याबाबत आयोजित करण्यात आले जनजागृती शिबिर

नागपुर ग्रामीण पोलीस विभागातर्फे महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवसाच्या उपक्रम अंतर्गत संपूर्ण देशामध्ये लागू झालेल्या तीन नवीन कायद्याबाबत जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले असुन सदर मार्गदर्शन शिबीरामध्ये सामान्य जनतेपर्यंत १जुलै २०२४ पासुन संपूर्ण देशामध्ये लागुन झालेल्या १. भारतीय न्याय संहिता , २. भारतीय नागरिक सुरक्षा संहीता ,३. भारतीय साक्ष अधिनियम या तिन नविन कायदयाबाबत जनजागृती करणे कामी खालील ठिकाणी शिबीर आयोजीत करून मार्गदर्शन करण्यात आले आहे.

**काटोल उपविभाग :–** दिनांक १७ जानेवारी २०२५ रोजी काटोल उपविभाग अंतर्गत खालील ठिकाणी नविन कायदे मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले आहे. सदर कार्यक्रमांमध्ये श्री रमेश बरकते ,उपविभागीय पोलिस अधिकारी रामटेक विभाग रामटेक यांच्या मार्गदर्शनामध्ये सपोनि मस्कर साहेब यांनी नवीन तीन कायद्याबाबत सखोल मार्गदर्शन केले.

१. **पोलीस स्टेशन काटोल** अंतर्गत काटोल **नबीया कॉलेज** येथे तीन नवीन फौजदारी कायद्याबाबत जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबिरामध्ये विदयालयातील शिक्षक आणि विदयार्थी उपस्थित होते.

२. **पोलीस स्टेशन नरखेड** अंतर्गत **पंढरीनाथ महाविदयालय** येथे तीन नवीन फौजदारी कायद्याबाबत जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबिरामध्ये विदयालयातील शिक्षक आणि विदयार्थी उपस्थित होते. ३. **पोलीस स्टेशन जलालखेडा** अंतर्गत **ए.डी. कॉलेज** येथे तीन नवीन फौजदारी कायद्याबाबत जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबिरामध्ये महाविदयालयातील प्राध्यापक आणि विदयार्थी उपस्थित होते.

**रामटेक उपविभाग** :– दिनांक १८ जानेवारी २०२५ रोजी रामटेक उपविभाग अंतर्गत खालील ठिकाणी नविन कायदे मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले आहे. सदर कार्यक्रमांमध्ये श्री रमेश बरकते उपविभागीय पोलिस अधिकारी रामटेक विभाग रामटेक यांच्या मार्गदर्शनामध्ये सपोनि मस्कर साहेब यांनी नवीन तीन कायद्याबाबत सखोल मार्गदर्शन

१. **पोलीस स्टेशन पारशिवनी** अंतर्गत मौजा नया कुंड येथील सूर्य आंबा स्पिनिंग मिल लिमिटेड येथे तीन नवीन कायद्याबाबत जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले होते. सदर कार्यक्रमांमध्ये पारशिवनी पोलीस, सूर्यबा स्पिनिंग मिल चे कर्मचारी तसेच स्थानिक गावकरी, पोलीस पाटील उपस्थित होते. २. **पोलीस स्टेशन अरोली** अंतर्गत अरोली येथील **संत कृपा मंगल कार्यालय** येथे तीन नवीन फौजदारी कायद्याबाबत जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबिरामध्ये पोलीस स्टेशन अरोली चे अधिकारी, पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष, ग्रामस्थ हे उपस्थित होते. सदर ठिकाणी ॲड. भगत यांनी सुध्दा नवीन तीन कायद्याबाबत मार्गदर्शन केले.३. **पोलीस स्टेशन रामटेक** अंतर्गत मनसर येथील **राष्ट्रीय आदर्श विदयालय** येथे संपूर्ण देशामध्ये लागू झालेल्या तीन नवीन फौजदारी कायद्याबाबत जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबिरामध्ये विदयालयातील शिक्षक आणि विदयार्थी उपस्थित होते.

**सावनेर उपविभाग :—** दिनांक २० जानेवारी २०२५ रोजी सावनरे उपविभाग अंतर्गत खालील ठिकाणी नविन कायदे मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले आहे. सदर कार्यक्रमांमध्ये उपविभागीय पोलिस अधिकारी रामटेक विभाग रामटेक यांच्या मार्गदर्शनामध्ये सपोनि मस्कर साहेब यांनी नवीन तीन कायद्याबाबत सखोल मार्गदर्शन केले.

१.**पोलीस स्टेशन कळमेश्वर** अंतर्गत **भाभा महाविदयालय** येथे तीन नवीन फौजदारी कायद्याबाबत जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबिरामध्ये विदयालयातील महाविदयालय येथील प्राध्यापक आणि विदयार्थी उपस्थित होते. २.**पोलीस स्टेशन खापा** येथे तीन नवीन फौजदारी कायद्याबाबत जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबिरामध्ये खापा येथील प्रतिष्ठीत नागरिक,पोलीस पाटील आणि खापा पोलीस स्टेशनचे अधिकारी अंमलदार उपस्थित होते.











## कोळसा चोरी करणाऱ्या आरोपीस अटक

पोलीस स्टेशन कन्हान :— कन्हान पोलीस पोलीस स्टेशन हददीत पेट्रोलींग करीत असतांना त्यांना संदीप सुकई साहनी वय २१ वर्ष रा.कामठी कॉलनी खदान नं.३ कन्हान हा संशयीत रित्या मोटर सायकल वर फिरतानां मिळुन आला पोलीसांनी पंचासमक्ष त्याची झडती घेतली असता त्याचे ताब्यात ३ बोरी कोळसा वजन अंदाजे ४०० किलो किंमत ३००० रू चा मुददेमाल मिळुन आल्याने पंचासमक्ष तो जप्त करण्यात आला आहे. आरोपी संदीप सुकई साहनी वय २१ वर्ष रा.कामठी कॉलनी खदान नं.३ कन्हान याचे वर पोलीस स्टेशन कन्हान येथे ३०३(२) बीएनएस अन्वये गुन्हा नोंद केला असुन आरोपीला अटक करण्यात आली आहे.

# अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

पोस्टे उमरेडः— दिनांक १९/०१/२०२५ रोजी पोस्टे उमरेड येथील स्टाफ पोस्टे परिसरात पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, भिवापुर कडुन उमरेडकडे अवैध्यरीत्या रेतीने भरलेला टिप्पर येत आहे. अशा विश्वसनीय खबरेवरून पोलीस स्टॉफ यांनी मौजा इटनकर पेट्रोल पंपचे जवळ अंदाजे भिवापुर ते उमरेड रोड येथे नाकाबंदी केली असता टिप्पर क्र. एम एच ४० सीटी ५८३४ असा दिसुन आला. त्यावर चालकास त्यांचे नाव गाव व पत्ता विचारले असता त्यांनी आपले नाव **निकेश नारायण तांदुळकर वय ३५ वर्ष रा चांपा ता. उमरेड** असे सांगितले. त्यास वाहतुकीचा परवाना विचारले असता रेतीचा कोणत्याही प्रकारचा परवाना नसल्याचे सांगीतले वरून, सदर टिप्परची पाहणी केली असता सदर अशोक लेलॅन्ड कंपनीची एमएच ४० सिटी ५८३४ किमती २००००००/ रू व त्यामधील ०८ ब्रॅस रेती किमीत ४००००/— रू असा एकुण २०४००००/— चा मुदेमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. आरोपी चालक नामे— **१) निकेश नारायण तांदुळकर वय ३५ वर्ष रा चांपा ता उमरेड मालक २) रूपेश दिलीप कानतोडे वय ३४ वर्ष रा मांगली ता उमरेड** यांचेविरुद्ध पोस्टे उमरेड येथे कलम ३०३(२), ४९, ३(५), महाराष्ट्र जमीन महसुल अधि ४८(७) ४८(८) खाणी अणि खनिज अधि ४, २१ सार्वजनिक संपती नुकसान प्रतिबंधक अधि ३ पर्यावरण संरक्षण अधि १५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**